मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील विस्थापितांच्या वसाहतीतील बेकायदेशीर हस्तांतरणे नियमानुकूल करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय, क्र. ईव्हीपी-२०१७/५८५/प्र.क्र.११७/र-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगूरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दि.१८ सप्टेंबर, २०१९

वाचा :- शासन निर्णय,महसूल व वन विभाग, क्र.ईव्हीपी-२०१७/५८५/प्र.क्र.११७/र-६ दि.९ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील विस्थापितांच्या वसाहतीतील विस्थापितांकडून - विस्थापितांना व विस्थापितांकडून -बिगर विस्थापितांना सदनिका, बैठी घरे ,बॅरेक्स मधील खोल्या, वाणिज्यिक/औद्योगिक गाळे, यांची विक्री/बक्षिसपत्र किंवा दानपत्र इत्यादीद्वारे झालेली अवैध हस्तांतरणे, हस्तांतरण शुल्क आकारुन आजमितीस राहणाऱ्या व्यक्तींचे नावे शर्तभंग नियमानुकूल करण्यासंबंधीचा प्रस्ताव दि. ९ सप्टेंबर,२०१९ च्या मंत्रीमंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर मंत्रीमंडळ बैठकीत चर्चा झाली व प्रस्तुत प्रकरणातील शर्तभंग नियमानुकूल करण्याची कार्यपद्धती ठरविणे व त्यानुसार अंतिम निर्णय घेण्यासाठी मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्याचा निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यात मंत्रीमंडळ उपसमितीने घेतलेला निर्णय अंतिम असेल व त्यासाठी परत मंत्रीमंडळ मान्यतेची आवश्यकता असणार नाही, असाही निर्णय घेण्यात आला. त्यानुसार संदर्भाधीन दिनांक ९ सप्टेंबर,२०१९ च्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली. या समितीची दि.१३ सप्टेंबर, २०१९ रोजी बैठक संपन्न झाली. मंत्रीमंडळ उपसमितीने घेतलेल्या निर्णयानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील विस्थापितांच्या वसाहतीतील विस्थापितांकडून - विस्थापितांना व विस्थापितांकडून -बिगर विस्थापितांना सदनिका, बैठी घरे , बॅरेक्स मधील खोल्या ,वाणिज्यिक/औद्योगिक गाळे, यांची विक्री/बक्षिसपत्र किंवा दानपत्र इत्यादीद्वारे झालेली विनापरवाना-अवैध हस्तांतरणे/ शर्तभंग, खालीलप्रमाणे दंड/शुल्क आकारून विहीत अटी-शर्तींची पुर्तता करणाऱ्या व आजमितीस राहणाऱ्या व्यक्तींच्या नावे शर्तभंग नियमानुकूल करण्यास या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

वर्गवारी	**प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार मिळकतीच्या मुल्यांकनानुसार आकारावयाच्या शुल्क/दंडाची टक्केवारी**	
	विस्थापितांकडून-विस्थापितांकडे	**विस्थापितांकडून-बिगर विस्थापितांकडे**
१९६८ पूर्वीची	**१ %**	**५ %**
१९६८ ते १९७८दरम्यानची	**३ %**	**१५ %**
१९७८ नंतरची	**४ %**	**२० %**

२. शर्तभंग नियमित करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना असतील. शर्तभंग नियमानुकूल करताना, दंडाची रक्कम फ़क्त एकदाच आकारण्यात यावी. या योजनेचा कालावधी हा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून २ वर्ष राहील. तद्नंतर प्रचलित बाजार मुल्याइतकी रक्कम दंड म्हणून आकारुन शर्तभंग नियमानुकूल करण्यात यावेत.

३. योजनेच्या अन्य अटी व शर्ती पुढीलप्रमाणे असतील :-

अ) शर्तभंग नियमित करण्यासाठी इच्छूकांनी स्वत:हून जिल्हाधिकाऱ्यांकडे विहीत मुदतीत अर्ज करून आवश्यक कागदपत्रे पुरविणे बंधनकारक राहील.

ब) इमारतीतील सदनिका,बैठी घरे,बॅरॅक्स मधिल खोल्या आणि वाणिज्यिक / औद्योगिक गाळे यांचे हस्तांतरण म्हणजे दुय्यम निबंधक यांचेकडे रितसर नोंदविलेला व्यवहारच ग्राह्य समजण्यात यावा.इतर कोणतेही दस्त / करार

विचारात घेतले जावू नयेत.हस्तांतरणाबाबत नोंदणीकृत दस्तऐवजाचा पुरावा सादर करण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

क) शर्तभंग प्रकरणे नियमानुकूल करण्यापूर्वी खरेदी- विक्री झालेल्या कागदपत्रांची पडताळणी करून,त्यामध्ये मुद्रांक शुल्क भरणा करण्यात आले आहे किंवा नाही, हे तपासून भरणा करण्यात आला नसेल तर दंडासहीत त्याचा भरणा करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

ड) सदर शर्तभंग नियमितीकरणाची योजना यापूर्वी झालेल्या हस्तांतरणासाठीच, सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीसाठी लागू राहील.विहीत मुदतीत कार्यवाही पूर्ण होणेसाठी या निर्णयाला / योजनेला संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी .

इ) जिल्हाधिकारी यांना धोरणाशी सुसंगत वाटतील अशा अन्य अटी व शर्ती.

४. प्रस्तुत योजनेची/धोरणाची अंमलबजावणी करतांना काही अडचणी उदभवल्यास त्या अनुषंगाने योजनेच्या वरील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार शासनाकडे राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०९१८१८३९१५४११९ असा आहे. हे आदेश डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shahajahan Shakur Mulani

Digitally signed by Shahajahan Shakur Mulani
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fe995676d2b60024012af0b1df31396dfbfe33f49b4cd9f6c29a75466c24c0d, cn=Shahajahan Shakur Mulani
Date: 2019.09.18 18:44:57 +05'30'

(शहाजहान मुलाणी)
शासनाचे अवर सचिव

प्रति,

१.मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

२.मा.विरोधी पक्ष नेता (विधानसभा / विधान परिषद),विधानभवन , मुंबई.

३. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

४. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

५. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

६. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

७. मा. राज्यमंत्री,(नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

८.महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधान सभा/विधान परिषद सदस्य,

९.अपर मुख्य सचिव,(महसूल),मंत्रालय, मुंबई,

१०.प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई,

११. सचिव (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई,

१२. विभागीय आयुक्त ,कोकण विभाग,जुने सचिवालय,फोर्ट,मुंबई,

१३.जिल्हाधिकारी,मुंबई शहर,

१४. जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर,

१५.जमाबंदी आयुक्त,संचित मालमत्ता नुकसान भरपाई तथा निर्वासित मालमत्तेचे परीरक्षक, महाराष्ट्र राज्य,मुंबई,

१६.व्यवस्थापकीय अधिकारी,मुंबई शहर जिल्हा,

१७. व्यवस्थापकीय अधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा,

१८.महालेखापाल -१ (लेखा परीक्षा व लेखा अनुज्ञयता), महाराष्ट्र,मुंबई ,

१९.वित्त विभाग (कार्यासन व्यय-१०), मंत्रालय, मुंबई,

२०. निवड नस्ती (कार्यासन र-६)